आजचे पंचांग

दिनांक : ५ ऑगस्ट २०२६ वार : बुधवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : सप्तमी तिथी (रात्री ०८:४२ पर्यंत) त्यानंतर अष्टमी तिथी नक्षत्र : अश्विनी नक्षत्र (रात्री ०९:१७ पर्यंत) त्यानंतर भरणी नक्षत्र योग : शूल योग (सायंकाळी ०५:२८ पर्यंत) त्यानंतर गण्ड योग करण : विस्ती भद्रा करण (सकाळी ०९:२६ पर्यंत) त्यानंतर भाव करण

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३०८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### पंतप्रधान मोदींच्या स्वप्नावर तुकाराम मुंढेंचे विधान चर्चेत

**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ मध्ये भारताला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहिले आहे. विकसित भारताची संकल्पनाही त्यांनी अनेकदा आपल्या भाषणातून जाहीर केली. मात्र, आपल्या रोखठोक वक्तव्यासाठी आणि प्रशासकीय कामासाठी प्रसिद्ध असलेले राज्याचे वरिष्ठ सनदी अधिकारी तथा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यावर आपले मत व्यक्त करताना एक महत्त्वाचा सल्ला दिला. त्यामुळे २०४७ च्या भारतावर मुंढेंची प्रतिक्रिया हा चर्चेचा विषय झाला आहे.

## सारांश वृत्त

### पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांचे निधन; शिक्षण क्षेत्रातील युगपुरुष काळाच्या पडद्याआड



■ दैनिक राज्य लोकतंत्र

कोल्हापूर । प्रतिनिधी

माजी राज्यपाल, शिक्षणमहर्षी आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित डॉ. डी. वाय. पाटील यांचे मंगळवारी वयाच्या ९०व्या वर्षी कोल्हापुरात निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण, सहकार, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे. डॉ. डी. वाय. पाटील यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात बिहार, त्रिपुरा आणि पश्चिम बंगाल या राज्यांचे राज्यपाल म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. प्रशासकीय अनुभव, लोकाभिमुख दृष्टिकोन आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यामुळे त्यांनी देशभरात वेगळी ओळख निर्माण केली. महाराष्ट्रात शाळा, महाविद्यालये, वैद्यकीय, अभियांत्रिकी तसेच नामांकित विद्यापीठांचे विस्तृत जाळे उभारून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचा ध्यास घेत त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था उभारल्या. शिक्षण, समाजसेवा आणि सार्वजनिक जीवनातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत भारत सरकारने १९९१ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविले होते. त्यांच्या निधनाच्या वृत्तानंतर विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला असून, शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि दूरदृष्टी कायम स्मरणात राहील, अशा भावना व्यक्त होत आहेत.

त्यांच्या निधनाची माहिती समोर येताच विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या कार्याची आठवण करत अनेकांनी त्यांना आदरांजली वाहिली.

डी. वाय. पाटील यांच्या निधनाने महाराष्ट्रासह देशाच्या सार्वजनिक जीवनातील एका अनुभवी नेतृत्वाचा अंत झाला असून, त्यांच्या राजकीय अनुभव, शैक्षणिक कार्य आणि समाजसेवेची कायम स्मरणात राहणारी परंपरा मागे राहिली आहे.

# सरकार झोपेत, न्यायालय जागे!; घनकचरा व्यवस्थापनासाठी सर्वोच्च न्यायालयाला घालावी लागली मार्गदर्शक तत्त्वांची अट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

देशभरात घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना, प्रभावी नियोजन आणि स्पष्ट धोरण आखण्यात सरकारचे अपयश पुन्हा एकदा उघड झाले आहे. प्रदूषण करणाऱ्यांकडून पर्यावरण भरपाई कशी आणि कोणत्या निकषांवर वसूल करायची, याबाबत केंद्र सरकारकडे एकसमान व सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वेच नसल्याचे चित्र समोर आले. अखेर या मूलभूत धोरणासाठीही सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला 'घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६' अंतर्गत पर्यावरण भरपाई आकारण्यासाठी स्पष्ट, पारदर्शक आणि देशभर लागू होणारी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाच्या या आदेशामुळे पर्यावरण संरक्षणाच्या बाबतीत प्रशासनातील धोरणात्मक कमतरता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की, पर्यावरण भरपाई ही मनमानी किंवा महसूल वसुलीचे साधन असू शकत नाही. ती पर्यावरणाच्या झालेल्या वास्तविक नुकसानीचे मूल्यमापन करून तर्कसंगत आणि प्रमाणबद्ध असली पाहिजे. तसेच ही भरपाई केवळ दंडाचा पर्याय नसून, निसर्गाचे झालेले नुकसान भरून काढण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे दोषींना नियमित कायदेशीर दंडाबरोबरच पर्यावरण भरपाईही भरावी लागेल.



मात्र, या प्रकरणाने एक मोठा प्रश्न समोर आणला आहे. घनकचरा व्यवस्थापनाचे नियम, स्वच्छ भारत अभियान, कचरा प्रक्रिया प्रकल्प आणि पर्यावरण संरक्षणासाठी हजारो कोटी रुपयांचा खर्च होत असताना, पर्यावरण भरपाईसारख्या महत्त्वाच्या बाबतीत आजपर्यंत एकसमान धोरण का तयार झाले नाही? केंद्र आणि राज्यांच्या विविध यंत्रणा वेगवेगळ्या पद्धतीने कारवाई करत असल्याने अनेक ठिकाणी गोंधळ, विसंगती आणि वाद निर्माण होत असल्याची वस्तुस्थिती लपून राहिलेली नाही.

देशातील अनेक शहरांमध्ये कचऱ्याचे डोंगर उभे राहिले आहेत. अनधिकृत डंपिंग, उघड्यावर कचरा जाळणे, नद्यांमध्ये आणि ओढ्यांमध्ये टाकला जाणारा कचरा, तसेच प्रक्रिया प्रकल्पांच्या विलंबामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. मात्र, जबाबदारी निश्चित करण्याऐवजी प्रशासन अनेकदा केवळ नोटिसा आणि कागदी कारवाईतच अडकून राहिल्याची टीका पर्यावरण अभ्यासक सातत्याने करत आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने याच पार्श्वभूमीवर केवळ कायदे तयार करून भागणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी मजबूत संस्थात्मक व्यवस्था, उत्तरदायित्व आणि स्पष्ट कार्यपद्धती आवश्यक असल्याचे ठामपणे नमूद केले. न्यायालयाच्या या निरीक्षणाने पर्यावरणीय प्रशासनातील कमकुवत दुव्यांवर थेट बोट ठेवले आहे.

धोरण आखण्यात होणारा विलंब आणि अंमलबजावणीतला ढिसाळपणा यामुळे शेवटी न्यायालयालाच हस्तक्षेप करून सरकारला दिशा दाखवावी लागत असल्याचे चित्र वारंवार समोर येत आहे. पायाभूत सुविधा, प्रदूषण नियंत्रण, कचरा व्यवस्थापन किंवा पर्यावरण संरक्षणअनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत न्यायालयीन हस्तक्षेपाशिवाय प्रशासन हलत नसल्याची टीका अधिक तीव्र होत आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर केंद्र सरकार किती लवकर सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे तयार करते आणि त्यांची देशभर प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करते, याकडे पर्यावरण क्षेत्रासह सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे. कारण पर्यावरणाचा प्रश्न हा केवळ कायद्याचा विषय नसून, तो नागरिकांच्या आरोग्याचा, सार्वजनिक पायाभूत सुविधांचा आणि भावी पिढ्यांच्या सुरक्षित भविष्याचा प्रश्न आहे.

## सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय! नवीन कारसाठी ४ वर्षे, दुचाकीसाठी ६ वर्षे थर्ड-पार्टी विमा बंधनकारक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील वाढते रस्ते अपघात आणि विम्याविना धावणाऱ्या लाखो वाहनांवर लगाम घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायालयाने नवीन चारचाकी वाहनांसाठी थर्ड-पार्टी विमा ४ वर्षांसाठी, तर नवीन दुचाकींसाठी ६ वर्षांसाठी अनिवार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. यापूर्वी हा कालावधी अनुक्रमे ३ आणि ५ वर्षांचा होता. तसेच, विमा नसलेल्या वाहनांना पेट्रोल किंवा डिझेल नाकारण्याची व्यवस्था तंत्रज्ञानाच्या मदतीने शक्य आहे का, याचा अभ्यास करण्याचे निर्देश केंद्र सरकार आणि आयआरडीएला देण्यात आले आहेत.




न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना स्पष्ट केले की, २०१८ मधील आदेशानंतरही देशातील मोठ्या प्रमाणावर वाहने विम्याशिवाय रस्त्यावर धावत आहेत. विमा नियामक आयआरडीए आणि जनरल इन्शुरन्स कौन्सिलने कालावधी वाढवण्यास विरोध केला होता. मात्र, रस्ते सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत न्यायालयाने हा विरोध फेटाळून लावला.

न्यायालयाने म्हटले की, मोटार वाहन कायद्याच्या कलम १४६ अंतर्गत अनिवार्य थर्ड-पार्टी विम्याचा उद्देश केवळ अपघातग्रस्तांना आर्थिक भरपाई मिळवून देणे नसून, त्यांना दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेपासून वाचवणे हाही आहे. २०२४ मध्ये देशात ४.८७ लाखांहून अधिक रस्ते अपघात झाल्याच्या सरकारी आकडेवारीचा उल्लेख करत न्यायालयाने विमा नसलेल्या वाहनांमुळे अपघातग्रस्त आणि त्यांच्या कुटुंबीयांवर मोठे आर्थिक संकट कोसळत असल्याचे नमूद केले.

या निर्णयामुळे नवीन वाहन खरेदी करताना सुरुवातीच्या खर्चात वाढ होणार असली, तरी दीर्घकालीन विमा संरक्षण, अपघातग्रस्तांना वेळेवर भरपाई आणि रस्ते सुरक्षेला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## महिला उपमुख्यमंत्र्यांचा अपमान की राजकीय सहानुभूती? धनंजय मुंडेंचा काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर होत असलेल्या टीकेवरून राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. आमदार धनंजय मुंडे यांनी काँग्रेस आणि विरोधकांवर जोरदार निशाणा साधत, ही टीका राजकीय नसून महिला नेतृत्वाविषयीचा पूर्वग्रह आणि द्वेष असल्याचा आरोप केला. सुनेत्रा पवार यांनी कठीण परिस्थितीत जबाबदारी स्वीकारून जनतेसाठी काम सुरू केले असून, त्यांच्यावर वैयक्तिक टीका करणे योग्य नसल्याचे मुंडे म्हणाले.

बीड जिल्हा दौऱ्यातील वादावरही त्यांनी स्पष्टीकरण दिले. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर पत्रकार परिषद नसल्याची माहिती प्रशासनाने आधीच दिली होती, तरी काही माध्यमांनी मुद्दाम वाद निर्माण केल्याचा आरोप त्यांनी केला. शेतकरी आणि नागरिकांना शांतपणे आपले म्हणणे मांडण्याची विनंती केली होती, मात्र त्याचा विपर्यास करून चुकीचा संदेश पसरवण्यात आला, असे ते म्हणाले. मुंडे यांनी काही माध्यमकर्मींवर थेट टीका करत, ९५ टक्के पत्रकार प्रामाणिकपणे काम करतात, मात्र काही जण सातत्याने बीड जिल्ह्यातील वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करतात. सततची मीडिया ट्रायल आणि खोट्या बातम्यांमुळे मी वैतागलो आहे, अशी नाराजी व्यक्त केली. सार्वजनिक कार्यक्रमांमधील वक्तव्यांचाही चुकीचा अर्थ लावून बदनामी केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. विरोधकांवर हल्लाबोल करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा मुद्दाही उपस्थित केला. महाराष्ट्रातील प्रश्नांवर राजकारण करणाऱ्या काँग्रेसने झारखंडमधील पेपरफुटी प्रकरणावर का मौन बाळगले, असा सवाल त्यांनी केला. तसेच स्वतःविरोधातील अनेक आरोप न्यायालयात टिकले नाहीत, तरी आरोप करणाऱ्यांना कोणी जाब विचारत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

## अनिल देशमुखांना मोठा धक्का! १०० कोटींच्या कथित वसुलीप्रकरणी खटल्यासाठी ईडीला राज्यपालांची मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । विशेष वृत्त

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या अडचणी पुन्हा वाढल्या आहेत. बहुचर्चित १०० कोटी रुपयांच्या कथित वसुली आणि मनी लॉँड्रिंग प्रकरणात त्यांच्याविरोधात खटला चालवण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) राज्यपालांची अधिकृत मंजुरी मिळाली आहे. ईडीने ही माहिती आणि राज्यपालांचे मंजुरीपत्र विशेष न्यायालयात सादर केल्याने या प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रियेला नवे वळण मिळाले आहे.

विशेष सरकारी वकील सुनील गोन्साल्व्हिस यांनी न्यायालयात सादर केलेल्या माहितीनुसार, राज्यपालांनी २१ मे २०२६ रोजीच खटला चालवण्यास मंजुरी दिली होती. या मंजुरीमुळे मनी लॉँड्रिंग प्रतिबंधक कायद्यान्वये (PMLA) अनिल देशमुख यांच्याविरोधातील खटला पुढे नेण्याचा मार्ग आता कायदेशीरदृष्ट्या मोकळा झाला आहे.

या प्रकरणाची सुरुवात २०२१ मध्ये झाली होती. त्यावेळी मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप करत, पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि इतर अधिकाऱ्यांमार्फत मुंबईतील बार व रेस्टॉरंटमधून दरमहा १०० कोटी रुपये वसूल करण्याचे कथित निर्देश दिल्याचा दावा केला होता.

या आरोपांनंतर सीबीआय आणि ईडीने स्वतंत्र चौकशी सुरू केली. मनी लॉँड्रिंग प्रकरणात ईडीने देशमुखांना अटक केली होती आणि त्यांनी काही काळ कारावासही भोगला.

सध्या ते जामिनावर बाहेर आहेत. लोकसेवकाविरोधात खटला चालवण्यासाठी आवश्यक असलेली राज्यपालांची मंजुरी मिळाल्यानंतर या बहुचर्चित प्रकरणातील न्यायालयीन सुनावणीला वेग येण्याची शक्यता आहे. मात्र, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, मंजुरी मिळणे म्हणजे दोष सिद्ध होणे नव्हे. अंतिम निर्णय न्यायालयीन सुनावणी, पुरावे आणि कायदेशीर प्रक्रियेनंतरच होणार आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील घडामोडींवर राज्याच्या राजकीय वर्तुळासह संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## १५ ऑगस्टपूर्वी ङ्झऋई-केवायसी करा; अन्यथा घरगुती गॅसवर संकट! व्यावसायिक दराचा फटका बसण्याची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई । विशेष वृत्त

देशभरातील कोट्यवधी घरगुती एलपीजी गॅस ग्राहकांसाठी महत्त्वाचा इशारा देण्यात आला आहे. गॅस वितरण कंपन्यांनी सर्व ग्राहकांना १५ ऑगस्टपूर्वी ई-केवायसी (श-घधउ) प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले असून, ही मुदत चुकवल्यास घरगुती गॅस सिलेंडर मिळण्यात अडचणी येऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये घरगुती सिलेंडरऐवजी व्यावसायिक दराने सिलेंडर घ्यावा लागू शकतो किंवा रिफिल बुकिंग तात्पुरते रोखले जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

गॅस कंपन्यांच्या माहितीनुसार, या विशेष मोहिमेचा उद्देश प्रत्येक गॅस कनेक्शनची ओळख पडताळणे, बनावट किंवा अनधिकृत कनेक्शनवर कारवाई करणे आणि सरकारी अनुदानाचा लाभ केवळ पात्र ग्राहकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. त्यामुळे देशभरातील सर्व वितरकांना १५ ऑगस्टपर्यंत जास्तीत जास्त ग्राहकांची ई-केवायसी पूर्ण करण्या चे निर्देश देण्यात आले आहेत. अनेक भागांमध्ये अद्याप मोठ्या संख्येने ग्राहकांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे गॅस एजन्सीकडून ग्राहकांना फोन, एसएमएस आणि प्रत्यक्ष संपर्काद्वारे वारंवार सूचना दिल्या जात आहेत. काही ग्राहकांना रिफिल बुकिंगवर निर्बंध येऊ शकतात, असे संदेशही मिळाल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्राहकांना ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आपल्या जवळच्या गॅस एजन्सीला भेट देता येईल किंवा संबंधित गॅस कंपनीच्या अधिकृत ऑनलाइन सुविधेचा वापर करता येईल. यासाठी आधार कार्ड, नोंदणीकृत मोबाईल क्रमांक आणि आवश्यक ओळखपत्रांची पडताळणी केली जाते. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ग्राहकाच्या गॅस कनेक्शनची माहिती अद्ययावत केली जाते आणि भविष्यातील सेवा सुरळीत राहतात.

# न्यायाची दोरी धरून उभे असलेले तरुण वकीलच न्यायाच्या प्रतीक्षेत!; मानधनाच्या प्रश्नावर उच्च न्यायालयाचा सरकारला जाब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

न्यायव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या वकिली व्यवसायात प्रवेश करणारे हजारो तरुण वकील आज स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडत आहेत. सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालयात लढणारे हेच तरुण वकील आर्थिक असुरक्षिततेमुळे व्यवसाय सोडण्याच्या उंबरठ्यावर उभे असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर कनिष्ठ आणि नवोदित वकिलांना दरमहा मानधन (स्टायपेंड) तसेच आर्थिक कल्याणकारी योजना लागू करण्याच्या मागणीवरील जनहित याचिकेची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांना उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

या सुनावणीदरम्यान न्यायालयाने व्यक्त केलेल्या निरीक्षणांनी न्यायव्यवस्थेतील एक कटू वास्तव अधोरेखित केले. वकिली व्यवसायाच्या सुरुवातीच्या काही वर्षांत अनेक तरुण वकिलांना अत्यल्प किंवा शून्य उत्पन्नावर काम करावे लागते. वरिष्ठ वकिलांकडे प्रशिक्षण घेताना नियमित मानधन मिळत नाही. न्यायालयीन कामकाज, प्रवास, कागदपत्रे, कार्यालयीन खर्च आणि दैनंदिन उदरनिर्वाहाचा भार पेलताना अनेकांची आर्थिक कोंडी होते.

परिणामी, कायद्याचे उच्च शिक्षण घेतलेले आणि गुणवत्तेच्या जोरावर न्यायालयात आलेले अनेक तरुण केवळ आर्थिक विवंचनेमुळे वकिली व्यवसायाला रामराम ठोकतात. काहीजण खासगी कंपन्या, बँका किंवा इतर क्षेत्रांमध्ये नोकरी स्वीकारतात, तर काहींची न्यायव्यवस्थेतील कारकीर्द सुरू होण्यापूर्वीच संपते. हा केवळ वैयक्तिक नुकसानाचा प्रश्न नसून न्यायव्यवस्थेच्या भविष्यासाठीही धोक्याची घंटा मानला जात आहे.

विशेष म्हणजे, सामान्य नागरिकांच्या न्यायासाठी लढणाऱ्या या तरुण वकिलांच्या आर्थिक सुरक्षिततेकडे आजपर्यंत राज्य सरकार आणि संबंधित संस्थांनी पुरेसे गांभीर्याने पाहिले नसल्याची टीका होत आहे. विविध कल्याणकारी योजना इतर क्षेत्रांसाठी राबवल्या जात असताना न्यायव्यवस्थेच्या पायाभूत घटक असलेल्या नवोदित वकिलांसाठी ठोस धोरण का तयार झाले नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

उच्च न्यायालयानेही या मुद्द्याकडे केवळ मानधनाच्या मागणीच्या दृष्टीने न पाहता, तरुण वकिलांना व्यवसायात टिकवून ठेवण्यासाठी संस्थात्मक पाठबळ आवश्यक असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. आर्थिक स्थैर्याशिवाय गुणवत्तापूर्ण न्यायव्यवस्था उभी राहू शकत नाही, ही वस्तुस्थिती न्यायालयाच्या निरीक्षणातून अधोरेखित झाली.

आज ग्रामीण आणि निमशहरी भागातील अनेक तरुण मोठ्या कष्टाने कायद्याचे शिक्षण पूर्ण करून न्यायालयात पाऊल ठेवतात. मात्र, पहिल्याच टप्प्यात उत्पन्नाचा कोणताही आधार नसल्याने त्यांना कुटुंबीयांवर अवलंबून राहावे लागते. अनेकांना कर्जाचा आधार घ्यावा लागतो. अशा परिस्थितीत गुणवत्तेपेक्षा आर्थिक परिस्थितीच व्यवसायात टिकण्याचा निकष ठरत असल्याची खंत विधी क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

आता या प्रकरणात राज्य सरकार आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा कोणती भूमिका मांडतात, याकडे संपूर्ण विधी क्षेत्राचे लक्ष लागले आहे. केवळ उत्तर सादर करून औपचारिकता पूर्ण केली जाणार की तरुण वकिलांसाठी प्रत्यक्ष मानधन, विमा, आरोग्य संरक्षण, प्रशिक्षण आणि आर्थिक सहाय्याच्या ठोस योजना जाहीर होणार, हा खरा प्रश्न आहे.

## संपादकीय

### बँकीपूरचा निकाल सत्ता अजूनही 'सगळं ठीक आहे' म्हणतेय, पण मतदार काही वेगळंच बोलतायत?

भारतीय राजकारणात सत्तेला एक विचित्र आजार जडतो. सुरुवातीला तो आत्मविश्वास असतो, नंतर तो अभिमान बनतो आणि शेवटी त्याचं रूपांतर जनतेला अजून काहीच समजत नाही अशा मानसिकतेत होतं. मग प्रत्येक टीका म्हणजे कटकारस्थान, प्रत्येक आंदोलन म्हणजे राजकारण, प्रत्येक प्रश्न म्हणजे राष्ट्रविरोध, आणि प्रत्येक पराभव म्हणजे अपघात. पण मतपेटीला ना प्रवक्ते असतात, ना टीव्ही डिबेट. ती फक्त शांतपणे निकाल देते.

बँकीपूरमध्ये प्रशांत किशोर जिंकले. एक जागा. एवढंच. पण कधी कधी इतिहास एका जागेपासून सुरू होतो. कारण मतदारांनी निकाल देताना विचारलं नाही की कोणाकडे सर्वात मोठी जाहिरात मोहीम आहे. त्यांनी विचारलं आमच्या आयुष्यात काय बदललं?

दर काही महिन्यांनी एखाद्या प्रकल्पाचं उद्घाटन होतं. त्याच प्रकल्पाचं पुन्हा उद्घाटन होतं. मग विस्ताराचं उद्घाटन होतं. कधी कधी वाटतं, प्रकल्प पूर्ण होण्यापेक्षा उद्घाटनांचे फोटोच जास्त तयार होतात. नागरिक मात्र अजूनही विचारत आहेत फीत कापली, आता काम कधी पूर्ण होणार?

सरकारवर टीका झाली की उत्तर तयार असतं देश इतका पुढे गेला आहे. प्रश्न असा आहे की देश पुढे गेला, पण सामान्य माणूसही तितकाच पुढे गेला का? बेरोजगार तरुण, भरतीची वाट पाहणारे उमेदवार, परीक्षा व्यवस्थेबद्दल प्रश्न विचारणारे विद्यार्थी, महागाईचा सामना करणारा मध्यमवर्ग यांच्या प्रश्नांना 'नॅरेटिव्ह' म्हणून नाकारलं तर प्रश्न संपत नाहीत.

राजकारणात एक जुनी म्हण आहे लोक घोषणा ऐकतात, पण मतदान अनुभवावर करतात. जर मतदारांना वाटू लागलं की भाषणं वाढत आहेत आणि उत्तरं कमी होत आहेत, तर कोणताही पक्ष असो, त्याच्यासाठी तो इशारा असतो.

याचा अर्थ भाजपचा काळ संपला आहे का? आज तसं ठामपणे म्हणता येणार नाही. पण इतकं मात्र नक्की म्हणता येईल की कोणत्याही सत्तेसाठी सर्वात धोकादायक क्षण तो नसतो जेव्हा विरोधक बोलू लागतात; तो असतो जेव्हा स्वतःचे समर्थकही प्रश्न विचारू लागतात.

लोकशाहीत सत्ता ही कायमस्वरूपी मालकी नसते; ती जनतेकडून घेतलेली मुदत असते. आणि प्रत्येक मुदतीच्या शेवटी एकच परीक्षा असते घोषणांची नाही, कामगिरीची. बँकीपूरचा निकाल कदाचित त्या परीक्षेची पहिली घंटा असेल किंवा कदाचित फक्त एक स्थानिक संदेश. अंतिम उत्तर २०२९ मध्ये मतदार देतील.

## कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करा; शमीम हुसेन फाउंडेशनची 'ग' क्षेत्रीय कार्यालयाकडे मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक २३ कचरा मुक्त करावा आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या व्यक्तींवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी शमीम हुसेन सोशल एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भातील एक निवेदन 'ग' प्रभाग अध्यक्षा तथा नगरसेविका मनीषा प्रमोद पवार आणि प्रभाग अधिकारी मुकेश कोळप यांना नुकतेच सादर करण्यात आले.आरोग्याचा प्रश्न गंभीरप्रभाग क्र. २३ मध्ये सध्या सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे कचरा टाकला जात आहे.

यामुळे संपूर्ण परिसरात कमालीची अस्वच्छता पसरली असून, दुर्गंधी व साथीच्या रोगांचा धोका प्रचंड वाढला आहे. या गंभीर समस्येवर प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी फाउंडेशनने केली आहे.

या प्रमुख ठिकाणांवर कचऱ्याचे ढीगनिवेदनात नमूद केल्यानुसार, 'ग'



क्षेत्रीय कार्यालयासमोरील मुख्य रस्ता, कावेरी नगर सबवे पुलाखालील परिसर, तसेच थेरगावमधील विविध सार्वजनिक ठिकाणी सातत्याने कचरा टाकला जात आहे.घंटागाडी असतानाही निष्काळजीपणाविशेष म्हणजे, महानगरपालिकेकडून सध्या घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडीची उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. असे असतानाही, काही नागरिकांकडून जाणीवपूर्वक सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकला जात आहे. या बेजबाबदार वर्तनामुळे परिसराचे विद्रुपीकरण होत असून, स्थानिक नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा संताप निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे.

## वाहतूक कोंडीवर उपाय; पिंपरी-चिंचवडमध्ये पार्किंग पॉलिसीची प्रभावी अंमलबजावणी होणार : महापौर रवि लांडगे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती वाहतूक कोंडी, वाहनांची वाढती संख्या आणि पार्किंगच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महापालिका आता पार्किंग पॉलिसीची प्रभावी अंमलबजावणी करणार असल्याची माहिती महापौर रवि लांडगे यांनी दिली. यासंदर्भात त्यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेत आढावा बैठक पार पडली.



बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर तसेच संबंधित अधिकारी आणि सल्लागार उपस्थित होते.

बैठकीत यापूर्वीच्या पार्किंग पॉलिसीच्या अंमलबजावणीदरम्यान आलेल्या अडचणी, त्रुटी आणि त्यामागील कारणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि प्रमुख रस्त्यांवरील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर पार्किंग व्यवस्थेचे पुनर्नियोजन करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

शहरातील रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी व्यापारी संकुले, सार्वजनिक ठिकाणे आणि प्रमुख चौकांमध्ये नियोजनबद्ध पार्किंग सुविधा उभारण्याबाबत चर्चा झाली. यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने स्मार्ट पार्किंग व्यवस्था विकसित करून नागरिकांना सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

बैठकीत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी शहरातील पार्किंगची सद्यस्थिती, उपलब्ध जागा, भविष्यातील गरजा आणि नियोजनाबाबत सादरीकरण केले. विविध भागांसाठी आवश्यक उपाययोजना आणि प्रस्तावांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. महापौर रवि लांडगे म्हणाले, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध आणि कार्यक्षम करण्यासाठी प्रभावी पार्किंग पॉलिसीची अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. नागरिकांना सुरक्षित व सुलभ पार्किंग सुविधा उपलब्ध करून देतानाच वाहतूक कोंडी कमी करणे, रस्त्यांचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करणे आणि शहराच्या नियोजनबद्ध विकासाला गती देणे हे महापालिकेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

## अण्णाभाऊ साठे स्मारकासाठी उपोषण तीव्र; दादाभाऊ लोखंडेंच्या आंदोलनाला महिला व विविध संघटनांचा भक्कम पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाच्या उभारणीच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते दादाभाऊ लोखंडे यांनी सुरू केलेले आमरण उपोषण मंगळवारी तिसऱ्या दिवशीही सुरूच राहिले. उपोषणस्थळी महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देत आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. स्मारकाबाबत प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आंदोलनकर्त्यांच्या मते, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि परिवर्तनवादी विचारांचा गौरव करणारे भव्य स्मारक उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. वारंवार आश्वासने मिळूनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे दादाभाऊ लोखंडे यांनी सांगितले.

उपोषणस्थळी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि महिला संघटनांच्या प्रतिनिधींनी भेट देत आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला. स्मारक उभारणीसाठी निश्चित कालबद्ध कृती आराखडा जाहीर करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, स्मारकाबाबत लवकर निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. दरम्यान, उपोषणाच्या तिसऱ्या दिवशीही दादाभाऊ लोखंडे यांनी आपला निर्धार कायम ठेवत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी पुन्हा केली.

## घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेची जनजागृती मोहीम; घरगुती कचरा चार प्रकारांत विलगीकरणाचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरभर व्यापक जनजागृती अभियान सुरू केले आहे. घरातून निर्माण होणारा कचरा ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य अशा चार प्रकारांत विलगीकरण करून महापालिकेच्या घंटागाडीला देण्याचे आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

महापालिकेकडून शहरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात घरोघरी भेटी देऊन नागरिकांना कचरा विलगीकरणाचे महत्त्व पटवून दिले जात आहे. विविध परिसरांमध्ये जनजागृती कार्यक्रम, प्रबोधन मोहिमा आणि नागरिकांशी थेट संवाद साधून घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ विषयी माहिती दिली जात आहे. महापालिकेच्या माहितीनुसार, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत प्रत्येक नागरिकाने घरातील कचऱ्याचे स्रोतस्थळीच चार प्रकारांत वर्गीकरण करणे बंधनकारक आहे. ओला, सुका, सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचरा स्वतंत्रपणे संकलित केल्यास त्यावरील प्रक्रिया अधिक सुलभ होते. तसेच पुनर्वापराला चालना मिळून लँडफिलवर जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यास मदत होते. महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार प्रत्येक घरातून कचऱ्याचे योग्य विलगीकरण झाल्यास शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक सक्षम होईल. नागरिकांनी महापालिकेच्या या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले की, स्रोतस्थळी कचरा विलगीकरण हा शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा मूलभूत टप्पा आहे. कचरा स्वतंत्रपणे दिल्यास प्रक्रिया अधिक वेगाने आणि परिणामकारकपणे करता येते, ज्यामुळे स्वच्छ शहराचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होते. अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले की, प्रत्येक प्रभागात नागरिकांशी थेट संवाद साधून कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती केली जात आहे. नागरिकांचा सहभाग वाढवून शहरातील घनकचरा व्यवस्थापन व्यवस्था अधिक प्रभावी आणि शाश्वत करण्यावर महापालिकेचा भर आहे.

# भोसरी पोलीस ठाणेची अवैध शस्त्र धारकांवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

आज दि. ०४/०८/२०२६ रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप घोरपडे सो.व मा. पोनि नाथा घार्गे (गुन्हे) सो.यांचे आदेशावरून सपोनि सोमनाथ टापरे व तपास पथकातील अंमलदार अवैध शस्त्र व अवैध धंद्यावर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार प्रभाकर खाडे ब.न.२२१९ यांना गोपनीय बातमीदारामार्फत विश्वसनीय माहिती मिळाली की एक इसम नामे संजय दादाभाऊ माने वय ४४ वर्ष रा.पांडवनगर लेन क्र. ०२ चक्रपाणी वसाहत भोसरी पुणे हा त्याचे जवळ गावठी पिस्तूल बाळगून आहे अशी माहिती प्राप्त झाल्याने सदर माहिती वरिष्ठांना अवगत करून वरिष्ठांनी योग्य कारवाई




करण्याच्या सूचना दिल्याने सदर ठिकाणी आरोपीचे राहते घरी जाऊन आरोपीची पंचा समक्ष झडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी पिस्तूल,एक राऊंड व एक रेडमी कंपनीचा मोबाईल मिळून आला असून ते पंचा समक्ष जप्त करून आरोपीस ताब्यात घेतले असुन भोसरी पोलीस ठाणे येथे कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये रीतसर कारवाई करत आहोत.

आरोपी पूर्व इतिहास : सदर आरोपी विरुद्ध भोसरी पोलीस स्टेशन मध्ये खालील गुन्हे दाखल आहे

1)cr.no -299/2016 IPC कलम 380

2) cr.no - 87/2017 IPC कलम 380

3) cr.no - 206/2017 IPC कलम ३८०

4) cr.no - 463/2017 IPC कलम ३७९

5) cr.no - 157/2018 IPC कलम ३७९

६) cr.no - 187/2018 IPC कलम ३८०, ३४

7) cr.no - 463/2020 महाराष्ट्र पोलीस कायदा १२२

8) cr.no - 70/2026 महाराष्ट्र पोलीस कायदा १४२

सदरची कामगिरी ही तपास पथकातील स.पो.नि.सोमनाथ टापरे, पो.शी. खाडे २२१९, पो. शी. गारुडकर १८२५, पो.शी. वाटकर ३८८९,पो.शी. सांगडे २३२४ यानी केली आहे.

**राहाटणीत कोयत्याचा धाक दाखवून लुटले**

पोलीस ठाणे: सांगवी

घटना: सांगवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारे सुमित सुनील गवारे (वय २०) हे दुचाकीने (चक १४ चथ ९६५३) जात असताना, संशयित आरोपी दीपक जाधव व त्याच्या एका साथीदाराने त्यांना अडवले. आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवून फिर्यादीच्या खिशातील ३,००० रुपये जबरदस्तीने काढून घेतले आणि दुचाकीच्या टाकीवर कोयत्याने मारून नुकसान केले.

कारवाई: सांगवी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपी दीपक जाधवला ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक माळगावे करत आहेत.

**भाडेकरूने घरातील सोन्याचे दागिने चोरून ठेवले बनावट दागिने**

पोलीस ठाणे: शिरगाव

घटना: गहुंजे (ता. मावळ) येथील लोढा बेलमेंडो टॉवरमध्ये राहणाऱ्या सबिना कोर मारवा (वय ५८) यांच्या घरातून आरोपी भाडेकरू अभिषेक लाखनसिंग सेंगर (वय २७, रा. इंदूर, मध्य प्रदेश) याने २९,२५,६०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरले. चोरी लपवण्यासाठी आरोपीने मूळ दागिन्यांच्या जागी लाकडी कपाटात बनावट (नकली) सोन्याचे दागिने ठेवून घरमालकाची फसवणूक केली.

कारवाई: शिरगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक केंदे पुढील तपास करत आहेत.

**भाडेकरूने घरातील सोन्याचे दागिने चोरून ठेवले बनावट दागिने**

पोलीस ठाणे: शिरगाव

घटना: गहुंजे (ता. मावळ) येथील लोढा बेलमेंडो टॉवरमध्ये राहणाऱ्या सबिना कोर मारवा (वय ५८) यांच्या घरातून आरोपी भाडेकरू अभिषेक लाखनसिंग सेंगर (वय २७, रा. इंदूर, मध्य प्रदेश) याने २९,२५,६०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरले. चोरी लपवण्यासाठी आरोपीने मूळ दागिन्यांच्या जागी लाकडी कपाटात बनावट (नकली) सोन्याचे दागिने ठेवून घरमालकाची फसवणूक केली.

कारवाई: शिरगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक केंदे पुढील तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### चिमंळ उपबाजार समितीत पहिल्याच दिवशी कांद्याची विक्रमी आवक; प्रति किलोला २५ ते ३० रुपयांचा दर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

अहमदनगर/श्रीगोंदा : प्रतिनिधी

चिमंळ उपबाजार समितीच्या पहिल्याच दिवशी कांद्याची विक्रमी आवक झाली असून, शेतकऱ्यांच्या कांद्याला प्रति किलो २५ ते ३० रुपये इतका समाधानकारक दर मिळाला आहे. पहिल्याच दिवशी मिळालेल्या या चांगल्या बाजारभावामुळे उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.चेकने पेमेंट मिळाल्याने शेतकरी समाधानीकांदा विक्रीची रक्कम (पट्टी) व्यापाऱ्यांकडून थेट चेकद्वे अदा करण्यात आली. रोख पैशांच्या प्रतीक्षेत न राहता हक्काचे पैसे थेट चेकने मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, यामुळे बाजार समितीच्या कारभारावर विश्वास वाढल्याचे चित्र आहे. सभापती अतुल लोखंडे यांचे आवाहनया पार्श्वभूमीवर बोलताना बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, ''शेतकऱ्यांनी कोणत्याही मध्यस्थांना बळी न पडता, आपला शेतमाल केवळ श्रीगोंदा, काष्टी आणि चिमंळ येथील अधिकृत उपबाजार समित्यांमध्येच आणून विक्री करावा व समितीला सहकार्य करावे.''

### दुचाकीचोरी करणारी टोळी अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

दुचाकी आणि मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीला बावधन पोलिसांनी अटक केली. परया कारवाईत तीन आरोपींसह एका विधिसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून सुमारे ५ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या सात दुचाकी आणि २४ मोबाइल संच जप्त करण्यात आले आहेत. या तपासातून विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील चोरीचे सात गुन्हे उघडकीस आले.

पोलीस पथक म्हाळुंगे-नांदे रस्त्यावर गस्त घालत असताना दुचाकीवरुन जाणारा एक तरुण पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. त्यामुळे संशय आल्याने पोलिसांनी त्याचा पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. संबंधित दुचाकीला क्रमांक नव्हता. तसेच वाहनाच्या कागदपत्रांविषयी विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी दुचाकीच्या इंजिन आणि चेसिस क्रमांकाची तपासणी केल्यानंतर ती चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर संबंधित तरुणाची कसून चौकशी करण्यात आली.

# लाखणगावच्या नव्या पुलाचे काम अडीच वर्षांपासून ठप्प; संतप्त ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यातील लाखणगाव येथील घोडनदीवरील नव्या पुलाचे बांधकाम गेल्या अडीच वर्षांपासून रखडल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने हे काम तातडीने सुरू करून पूर्ण करावे, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

लाखणगाव येथे घोडनदीवर असलेला जुना पूल कमी उंचीचा आणि अरुंद असल्यामुळे पावसाळ्यात नदीला पूर आल्यानंतर अनेकदा पुलावरून पाणी वाहते. त्यामुळे पूल पाण्याखाली जाऊन वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. तसेच अरुंद रचनेमुळे या पुलावर वारंवार अपघातही घडले आहेत. ही समस्या कायमची दूर करण्यासाठी सुमारे १० कोटी रुपये खर्चाच्या नव्या पुलाचे बांधकाम सुरू करण्यात आले होते. मात्र, गेल्या अडीच वर्षांपासून हे काम अर्धवट अवस्थेतच पडून आहे.

दरम्यान, बेल्हे-जेजुरी तसेच अष्टविनायक महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहतुकीत मोठी वाढ झाली आहे. नाशिक, नगरसह उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांसाठी सोलापूर, सातारा आणि कोल्हापूरकडे जाण्यासाठी हा जवळचा मार्ग ठरत असल्याने या रस्त्यावर दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. आंबेगाव, शिरूर आणि जुन्नर



तालुक्यातील अनेक गावांतील नागरिकांसाठीही हा महत्त्वाचा दुवा आहे. सध्या सर्व वाहतूक जुन्या पुलावरूनच सुरू असून, पावसाळ्यात हा पूल वारंवार पाण्याखाली जात असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. नव्या पुलाचे सुमारे ६० ते ७० टक्के काम पूर्ण झाले असले, तरी दोन्ही बाजूंची कामे अद्याप अपूर्ण आहेत. यंदाच्या जुलै महिन्यात घोडनदीला आलेल्या पुरामुळे जुन्या पुलावरून पाणी वाहू लागल्याने काही काळ वाहतूक बंद ठेवावी लागली होती. त्यानंतर सोमवारी (३ ऑगस्ट) डिंभे धरणातून १७,२०० क्युसेक पाणी नदीपात्रात सोडण्यात आल्याने पुन्हा घोडनदीला पूर आला आणि जुन्या पुलावरून पाणी वाहू लागले. सुरक्षिततेच्या कारणास्तव प्रशासनाने वाहतूक बंद केल्यामुळे वाहनचालकांना मोठा फटका बसला. या घटनेनंतर पुन्हा एकदा नव्या पुलाचे काम नेमके का रखडले, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे, काम बंद पडून अडीच वर्षे उलटूनही ते का थांबले, याबाबत कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण मिळालेले नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप वाढला आहे ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने काम सुरू करून पूल पूर्ण करावा, अशी मागणी केली असून, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

## 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज' अभियानाला चालना; पुणे जिल्हा परिषदेकडून 'समृद्ध ग्राम संवाद' उपक्रम सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज' अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्यासाठी पुणे जिल्हा परिषद नवा उपक्रम राबविणार आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या संकल्पनेतून 'समृद्ध ग्राम संवाद' उपक्रम सुरू करण्यात येणार असून, त्याद्वे उत्कृष्ट गावांचा गौरव करण्याबरोबरच सरपंचांशी थेट संवाद साधला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद अध्यक्ष महिन्यातून दोन वेळा जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींच्या सरपंचांशी संवाद साधतील. ग्रामविकास, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी, स्थानिक समस्या, विकासकामांतील अडचणी आणि त्यावरील उपाययोजना याबाबत थेट चर्चा करण्यात येणार आहे.

'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज' अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गावांचा विशेष सन्मान करून इतर ग्रामपंचायतींनाही गुणवत्तापूर्ण कामासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. ग्रामीण भागात पारदर्शक, उत्तरदायी आणि लोकाभिमुख प्रशासन उभारण्यास या उपक्रमाची मदत होईल, असा विश्वास जिल्हा परिषद प्रशासनाने व्यक्त केला आहे.

'समृद्ध ग्राम संवाद'च्या माध्यमातून ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषद यांच्यातील समन्वय अधिक बळकट होईल. तळागाळातील प्रश्नांना प्राधान्याने वाचा फोडून विकासकामांना गती देण्यास तसेच योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास या उपक्रमाचा फायदा होणार असल्याचे सांगण्यात आले आहे

# डिंभे धरण शंभर टक्के भरले; जलपूजनाने जलसमृद्धीचा उत्सव साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मंचर । प्रतिनिधी

उत्तर पुणे जिल्ह्याच्या जलसंपदेचा कणा मानल्या जाणाऱ्या हुतात्मा बाबू गेनू जलाशय (डिंभे धरण) यंदा शंभर टक्के भरल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेकदादा वळसे पाटील यांच्या हस्ते विधिवत जलपूजन करण्यात आले.

यावेळी रमेश खिलारी, सभापती कैलास बुवा काळे, निलेश टीमकर, निलेश थोरात, अजय आवटे, प्रकाश घोलप, संजय गवारी, सुषमा शिंदे, सरपंच प्रसाद कराळे यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंबेगाव, शिरूर तसेच नगर जिल्ह्यातील काही भागासाठी जीवनवाहिनी ठरलेल्या डिंभे धरणाच्या



पाण्यावर हजारो एकर शेती अवलंबून आहे. ऊस, भाजीपाला, फळबागा आणि इतर नगदी पिकांसाठी हे धरण महत्त्वाची भूमिका बजावत असून अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोतही याच धरणातून उपलब्ध होतो. धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे आगामी रब्बी व उन्हाळी हंगामातील सिंचनाची चिंता मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. परिणामी शेतकरी वर्गात समाधानाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून यंदाच्या हंगामाबाबत आशावाद व्यक्त केला जात आहे.

जलपूजन प्रसंगी उपस्थितांनी चांगल्या पावसाबद्दल निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. त्याचबरोबर जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर आणि भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी जलव्यवस्थापनाची गरज अधोरेखित करण्यात आली.

भरलेले डिंभे धरण म्हणजे केवळ पाण्याचा साठा नसून उत्तर पुणे जिल्ह्याच्या कृषी समृद्धीची, जलसुरक्षेची आणि विकासाची नांदी आहे, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# पशुपालकांसाठी 'लोकनेते अजितदादा पवार पशुधन समृद्ध प्रशिक्षण योजना' सुरू

## प्रत्येक तालुक्यात होणार प्रशिक्षण शिबिरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र









पुणे : प्रतिनिधी

जिल्ह्यातील पशुपालकांना आधुनिक पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने 'लोकनेते अजितदादा पवार पशुधन समृद्ध प्रशिक्षण योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेद्वे प्रत्येक तालुक्यात किमान एक प्रशिक्षण शिबिर आयोजित करून ग्रामीण भागातील पशुपालकांना व्यवसायाभिमुख मार्गदर्शन दिले जाणार आहे.

जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समितीचे सभापती अमोल नलावडे यांनी या योजनेची माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, बदलत्या काळात पारंपरिक पशुपालनाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि उत्पादनक्षम पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी पशुपालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जाणार असून, पशुधनाचे आरोग्य व्यवस्थापन, लसीकरण, संतुलित आहार, दुग्ध उत्पादन वाढविण्याच्या पद्धती, गोठा व्यवस्थापन, चारा नियोजन तसेच आधुनिक पशुसंवर्धन तंत्रज्ञान याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे.

प्रशिक्षणामुळे पशुपालकांना आधुनिक आणि शाश्वत पद्धतीने व्यवसाय करण्यासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त होईल. त्यातून उत्पादनवाढ, खर्चात बचत आणि उत्पन्नात वाढ साध्य करण्यास मदत होणार असल्याचा विश्वास जिल्हा परिषद प्रशासनाने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यातील पशुधनाचा सर्वांगीण विकास, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना आणि पशुपालकांचे आर्थिक सक्षमीकरण हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या उपक्रमामुळे पशुपालन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन दुग्ध व्यवसाय अधिक सक्षम होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## वाड्यातील भाडेकरुला नवीन बांधकामात दुकान परत न देता फसवणूक करणाऱ्या सुराणा बिल्डर्ससह चार जणांवर गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधीवाडा पाडून विकसित करताना जुन्या जागेत दुकान असलेल्या आजीला वाढीव क्षेत्रफळाचे दुकान देण्याचा करार करताना खाडाखोड करुन अस्तित्वात नसलेले १२ अ दुकान देण्याचा करार केला. त्यासाठी आणखी १ लाख ३० हजार रुपये घेऊन दुकान न देता फसवणूक केल्या प्रकरणी सुराणा बिल्डर्ससह चौघांवर खडक पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अविनाश विनायक सूर्यवंशी (वय३२, रा. सोमनाथनगर, वडगाव शेरी) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी सुराणा बिल्डर्सचे उदयकांत भानुदास सुराणा, प्रित सुहास ठाकुर, तेजस सुहास ठाकुर, सुहास मुरलीधर ठाकुर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार गुरुवार पेठेत जानेवारी २०११ ते डिसेंबर २०१३ दरम्यान घडला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची आजी प्रभावती जगन्नाथ सूर्यवंशी या गुरुवार पेठेतील वाड्यात भाडेकरु होत्या. त्यांचे एक दुकान होते. त्या ठिकाणी त्या शिलाई मशीनचे काम करत होत्या. सुराणा बिल्डर्स, प्रमोटर्स ॲन्ड डेव्हलपर्सचे उदयकांत सुराणा यांनी २००८ -०९ मध्ये ती सर्व जागा डेव्हलप करण्यासाठी घेतली.

त्यावेळी आजीचे दुकान ८० स्क्वेअर फुट होते. त्यांना ते १०० स्क्वेअर फुटाचे दुकान देणार होते. त्यासाठी १ लाख ९० हजार रुपये जास्तीचे सुराणा बिल्डर्स यांना द्यायचे होते. त्यापैकी १ लाख ३० हजार रुपये त्यांनी सुराणा यांना दिले. उरलेले ६० हजार रुपये प्रत्यक्ष दुकानाचा ताबा मिळाल्यावर द्यायचे असे ठरले होते. सुराणा बिल्डर्स आजीला १२ अ हे दुकान देणार होते. तसा करार केला होता. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यांनी वेळोवेळी दुकानाची मागणी केली. सुराणा याने टाळाटाळ केली. फिर्यादी यांनी महापालिकेतील प्लॅन पाहिल्यावर त्यात १२ अ हे अस्तित्वात नव्हते.

सुराणा याने अस्तित्वात नसलेले १२ अ दुकान देण्याचा वायदा करुन त्यांच्याबरोबर करार केला होता. आजीचा मृत्यु झाल्यानंतर त्यांच्या तिच्या वारसांना देखील दिलेला नाही. सुराणा बिल्डर्स हे दुकान प्रभावती सूर्यवंशी यांना देणार असल्याचे माहिती असतानाही प्रिता सुहास ठाकूर, तेजस सुहास ठाकूर, सुहास ठाकूर यांनी ते दुकान १४ मार्च २०१३ रोजी ६ लाख रुपयांना विकत घेतले. सहायक पोलीस निरीक्षक अनिता तोंडे तपास करीत आहे.

# पुणेकरांचा प्रवास महागणार! रिक्षा भाडेवाढीला 'आरटीए'ची मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

महागाईच्या वाढत्या झळांमुळे त्रस्त असलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना आता रिक्षा प्रवासासाठीही जास्त पैसे मोजावे लागणार आहेत. पुणे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने (आरटीए) रिक्षा भाडेवाढीला मंजुरी दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली 'आरटीए'ची बैठक झाली. या बैठकीत रिक्षाच्या भाडेवाढीबाबत चर्चा करण्यात आली. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) अद्याप भाडेवाढ जाहीर करण्यात आलेली नाही. येत्या दोन दिवसात नवीन भाडे



दर जाहीर करणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सांगितले.

**रिक्षाचे जून दर काय आहेत?**

पुण्यात पहिल्या १.५ किलोमीटर प्रवासातही २५ रुपये आणि त्यानंतर १७ रुपये प्रती किलोमीटर असा दर आकारण्यात येतो. आता मात्र नवीन दरानुसार हे भाडे वाढणार असल्याची शक्यता आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून रिक्षा संघटनांकडून भाडेवाढीची मागणी करण्यात येत होती. सीएनजीच्या किमतीत झालेली

> 'आरटीए'ची बैठक चांगली झाली. या बैठकीत पुण्यातील वाहतुकीसंदर्भात वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. भाडेवाढीचा निर्णय अद्याप जाहीर करण्यात आला नाही. लवकरच हा निर्णय जाहीर करण्यात येईल.
>
> – अर्चना गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी

मोठी वाढ, वाहनांच्या सुट्या भागांचे वाढलेले दर, विमा, देखभाल आणि दुरुस्तीवरील वाढता खर्च तसेच सर्वसाधारण महागाईमुळे सध्याच्या भाडेदरात व्यवसाय करणे परवडत नसल्याचे संघटनांचे म्हणणे होते. या पार्श्वभूमीवर 'आरटीए'च्या बैठकीत चर्चा करण्यात आली. पुण्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत रिक्षांचा मोठा वाटा आहे. पुणे शहर आणि परिसरात साधारण दीड लाखांच्या आसपास रिक्षा धावतात. त्यामुळे दररोज लाखो प्रवासी रिक्षाने प्रवास करतात. रिक्षाच्या भाडेवाढीचा सर्वाधिक फटका दैनंदिन प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना बसणार आहे. शाळा, कॉलेज, कार्यालयात जाण्यासाठी रिक्षेचा वापर करणाऱ्यांचा मासिक खर्च वाढणार आहे. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून कोणतीही भाडेवाढ न झाल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या रिक्षाचालकांसाठी हा निर्णय दिलासादायक ठरणार असल्याचीही भावना व्यक्त करण्यात येत आहे.

## निकृष्ट विकासकामांना आळा घालण्यासाठी स्वतंत्र साहित्य चाचणी प्रयोगशाळा उभारावी

### पुणे जिल्हा कंत्राटदार असोसिएशनची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

जिल्ह्यातील सार्वजनिक व विकासकामांचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच निकृष्ट दर्जाच्या कामांना आळा घालण्यासाठी बांधकाम साहित्याच्या चाचणीसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा उभारण्यात यावी, अशी मागणी पुणे जिल्हा कंत्राटदार असोसिएशनने केली आहे. यासंदर्भातील निवेदन संघटनेच्या शिष्टमंडळाने पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांची भेट घेऊन सादर केले.

निवेदनात ग्रामीण आणि शहरी भागातील रस्ते, शासकीय इमारती तसेच इतर पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट, स्टील, खडी आणि इतर बांधकाम साहित्याची गुणवत्ता तपासण्यासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र व अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. संघटनेच्या मते, स्थानिक पातळीवर साहित्य चाचणीची सुविधा उपलब्ध झाल्यास बांधकाम साहित्याचा दर्जा तातडीने तपासता येईल. त्यामुळे निकृष्ट साहित्याचा वापर रोखणे, विकासकामांमध्ये पारदर्शकता वाढविणे आणि सार्वजनिक निधीचा योग्य वापर सुनिश्चित करणे शक्य होईल.

याशिवाय, कामांच्या गुणवत्तेबाबत उद्भवणारे वाद कमी होतील आणि कंत्राटदार, प्रशासन तसेच नागरिकांमध्ये विश्वास वाढण्यास मदत होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## सारांश वृत्त

### मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी केंद्र सरकारची दोन तृतीयांश बहुमत पार करण्याची तयारी झालीये?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली: प्रतिनिधी**

संसदेच्या दोन्ही सभागृहात सार्वजनिक परीक्षा सुधारणा दुरुस्ती विधेयक मंजूर झाले आहे. राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीनंतर विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. पावसाळी अधिवेशनाचा दुसरा आठवडा ३१ जुलै रोजी पूर्ण होईल. पहिल्या दिवसापासूनच गोंधळ सुरू असून, मोदी सरकारने गदारोळातच कामकाज उरकण्यास सुरुवात केली आहे. संसदेच्या अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यात सरकार दोन महत्त्वाची विधेयके मंजूर करण्यात यशस्वी ठरले असून, आता सर्वांच्या नजरा महिला आरक्षणाशी संबंधित विधेयक आणि लोकसभा-विधानसभेच्या जागा वाढवणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाकडे लागल्या आहेत. संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलै रोजी सुरू झाले असून ते १३ ऑगस्ट २०२६ पर्यंत चालणार आहे. ३ जुलै रोजी संसदेच्या तिसऱ्या आठवड्यातील कामकाज पुन्हा सुरू होईल, जे १३ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. अशाप्रकारे, संसदेच्या अधिवेशनातील शेवटच्या ९ दिवसांत सरकार मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षणाशी संबंधित विधेयके मंजूर करण्यासाठी पावले उचलेल. मोदी सरकारने या दिशेने पाऊल टाकल्यास दोन तृतीयांश बहुमताचा आकडा कसा पार करणार? असा प्रश्न आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी तृणमूल काँग्रेस आणि उद्धवसेनेच्या लोकसभा खासदारांनी बंड केले. त्यामुळे संसदेत मोदी सरकारचे संख्याबळ सुधारले आहे. पण, पेपरफुटीच्या मुद्द्यावर झालेल्या विद्यार्थी आंदोलनामुळे पावसाळी अधिवेशनाचे पहिले दोन आठवडे गदारोळात गेले. आता पुढच्या आठवड्यात महत्त्वाचे कामकाज होण्याची आशा आहे.

# ‘डिजिटल अटक’ फसवणुकीवर सर्वोच्च न्यायालयाचा मोठा प्रहार! केंद्र, राज्ये, बँका आणि दूरसंचार यंत्रणांना कठोर निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरात वाढलेल्या ‘डिजिटल अटक’ सायबर फसवणुकीवर सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी कठोर भूमिका घेत केंद्र सरकार, सर्व राज्ये, भारतीय रिझर्व्ह बँक आणि दूरसंचार यंत्रणांना तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करणे, पीडितांच्या तक्रारींचे जलद निवारण, शून्य प्रथम माहिती अहवाल (झिरो एफआयआर) दाखल करण्याची प्रभावी व्यवस्था आणि फसवणुकीत गमावलेली रक्कम निश्चित कालमर्यादेत परत मिळवून देण्यासाठी यंत्रणा उभारण्याचे निर्देश दिले.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सायबर गुन्हेगार सरकारी अधिकारी, पोलीस, तपास यंत्रणा किंवा न्यायालयाचे नाव वापरून नागरिकांना व्हिडिओ कॉलद्वारे धमकावतात, स्वतःला ‘डिजिटल अटक’ झाल्याचे सांगतात आणि भीतीचे वातावरण निर्माण करून लाखो रुपयांची फसवणूक करतात. अशा वाढत्या गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रणासाठी सर्व संबंधित




यंत्रणांमध्ये समन्वय आणि त्वरित प्रतिसाद आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

गृह मंत्रालयाच्या भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने (आय-फोर-सी) सादर केलेल्या स्थिती अहवालाचाही न्यायालयाने उल्लेख केला. त्यानुसार, २०२४ मध्ये ‘डिजिटल अटक’ फसवणुकीच्या १,२३,६७२ तक्रारी नोंदविण्यात आल्या होत्या. ही संख्या २०२५ मध्ये ५८,२४९ पर्यंत घसरली, तर ३० जून २०२६ पर्यंत केवळ १६,३७७ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. जनजागृती, तांत्रिक उपाययोजना आणि सायबर गुन्ह्यांविरोधातील मोहिमांमुळे तक्रारींमध्ये लक्षणीय घट झाल्याचे न्यायालयाने नमूद केले.

मात्र, तक्रारी कमी झाल्या असल्या तरी सायबर फसवणुकीचा धोका अद्याप कायम असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे प्रत्येक राज्याने तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुलभ करावी, पीडितांना तत्काळ मदत उपलब्ध करून द्यावी आणि बँका, दूरसंचार कंपन्या तसेच तपास यंत्रणांमध्ये समन्वय वाढवावा, असे निर्देश देण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण आदेशामुळे देशातील सायबर सुरक्षेला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, ‘डिजिटल अटक’च्या नावाखाली नागरिकांची आर्थिक लूट करणाऱ्या सायबर गुन्हेगारांविरोधात आता अधिक कठोर आणि वेगवान कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

## नीट परीक्षेत नवा वाद! ओएमआर उत्तरपत्रिकेत फेरफाराचा आरोप; सहा विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नीट-यूजी २०२६ परीक्षेभोवतीचा वाद पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सहा विद्यार्थ्यांनी आपल्या ओएमआर उत्तरपत्रिकांमध्ये नोंदविलेली उत्तरे आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेने (एनटीए) उपलब्ध करून दिलेल्या उत्तरपत्रिकांच्या प्रतींमध्ये तफावत असल्याचा गंभीर आरोप करत मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. समुपदेशन प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी या प्रकरणाची तातडीने सुनावणी घ्यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

ही बाब भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले की, परीक्षेदरम्यान त्यांनी भरलेली उत्तरे आणि एनटीएने उपलब्ध करून दिलेल्या ओएमआर उत्तरपत्रिकांच्या प्रतींमध्ये अनेक ठिकाणी फरक आढळून आला आहे. त्यामुळे गुणांकन आणि अंतिम निकालाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, या तफावतीबाबत विद्यार्थ्यांनी एनटीएला ई-मेलद्वारे तक्रार केली होती. तसेच एनटीएच्या कार्यालयालाही प्रत्यक्ष भेट देऊन निवेदन दिले होते. मात्र, यापैकी कोणत्याही तक्रारीवर समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला. समुपदेशन प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी या प्रकरणावर निर्णय होणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. कारण उत्तरपत्रिकांतील कथित तफावत कायम राहिल्यास प्रवेश प्रक्रियेवर आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर थेट परिणाम होऊ शकतो.

## जागतिक आरोग्य संघटनेचा महत्त्वाचा इशारा! तीन सर्वसामान्य औषधांचा कर्करोगाच्या धोक्याशी संबंध; उपचार स्वतःहून थांबवू नका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

उच्च रक्तदाब, बुरशीजन्य संसर्ग आणि अवयव प्रत्यारोपणानंतर रुग्णांना दिली जाणारी तीन सर्वसामान्य औषधे मानवांसाठी कर्करोगाचा धोका निर्माण करू शकतात, असे वर्गीकरण जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय कर्करोग संशोधन संस्थेने (आयएआरसी) केले आहे. मात्र, या निर्णयाचा अर्थ ही औषधे तातडीने बंद करावीत असा नसून, रुग्णांनी डॉक्टरांचा सल्ला न घेता उपचार थांबवू नयेत, असा स्पष्ट इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

आयएआरसीने हायड्रोक्लोरोथायाझाइड (उच्च रक्तदाब), व्होरिकोनाझोल (बुरशीजन्य संसर्ग) आणि टॅक्रोलिमस (अवयव प्रत्यारोपणानंतर अवयव नाकारला जाऊ नये म्हणून दिले जाणारे प्रतिकारशक्ती कमी करणारे औषध) या औषधांचा ‘गट-१ : मानवांसाठी कर्करोगकारक’ या श्रेणीत समावेश केला आहे. ही तिन्ही औषधे जागतिक आरोग्य संघटनेच्या अत्यावश्यक औषधांच्या यादीत असून जगभरातील लाखो रुग्णांना ती नियमितपणे दिली जातात.

तज्ज्ञांनी स्पष्ट केले की, आयएआरसीचे हे वर्गीकरण धोक्याची ओळख (क्तरअॅव खवशपींळषळलरींळेप) दर्शवते. म्हणजेच, विशिष्ट परिस्थितीत या औषधांमुळे कर्करोगाचा धोका संभवू शकतो; मात्र प्रत्येक रुग्णाला कर्करोग होईल, असा त्याचा अर्थ नाही. त्यामुळे औषधांचे फायदे आणि संभाव्य धोके यांचा निर्णय प्रत्येक रुग्णाच्या वैद्यकीय स्थितीनुसार डॉक्टर घेतात.

वैद्यकीय तज्ज्ञांनी रुग्णांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि कोणतेही औषध स्वतःहून बंद न करण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः उच्च रक्तदाब, गंभीर बुरशीजन्य संसर्ग किंवा अवयव प्रत्यारोपण झालेल्या रुग्णांसाठी ही औषधे जीव वाचवणारी ठरू शकतात. त्यामुळे उपचारात कोणताही बदल करण्यापूर्वी संबंधित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# भारतीय आयटी क्षेत्राला ट्रम्प यांचा मोठा झटका! क-१इ व्हिसा नियम आणखी कठोर; हजारो व्यावसायिकांवर वाढणार आर्थिक भार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

अमेरिकेतील क-१इ व्हिसा धोरण आणखी कठोर करण्याच्या दिशेने डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. विद्यमान क-१इ व्हिसाच्या मुदतवाढीसाठी अतिरिक्त शुल्क लागू करण्याचा प्रस्ताव पुढे आल्याने अमेरिकेत कार्यरत हजारो भारतीय आयटी व्यावसायिक आणि त्यांना रोजगार देणाऱ्या कंपन्यांवर आर्थिक भार वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आतापर्यंत असे अतिरिक्त शुल्क प्रामुख्याने नवीन क-१इ आणि ड-१ व्हिसा अर्जांपुरते मर्यादित होते.

नव्या प्रस्तावानुसार, क-१इ व्हिसाचे नूतनीकरण करतानाही कंपन्यांना अधिक शुल्क भरावे लागू शकते. त्यामुळे परदेशी कुशल कर्मचाऱ्यांना कायम ठेवण्याचा खर्च वाढणार असून, अमेरिकन कंपन्यांच्या भरती धोरणावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. २०२५ मध्ये क-१इ व्हिसा नूतनीकरणांमध्ये भारतीय व्यावसायिकांचा सर्वाधिक वाटा असल्याने या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम भारतीय आयटी क्षेत्रावर होऊ शकतो.

यापूर्वी ट्रम्प प्रशासनाने उच्च कौशल्य असलेल्या परदेशी कामगारांच्या नवीन क-१इ व्हिसासाठी १ लाख डॉलर्स शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्या निर्णयाला कनिष्ठ न्यायालयाने स्थगिती दिली होती. गेल्या महिन्यात अमेरिकेच्या फेडरल अपील न्यायालयानेही त्या स्थगितीला हटवण्यास नकार दिल्यानंतर प्रशासनाने आता व्हिसा प्रणाली अधिक कडक करण्याच्या हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत.

या संदर्भातील प्रस्तावित नियमांची प्राथमिक अधिसूचना जून २०२४ मध्ये अमेरिकेच्या डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटी आणि कस्टम्स अँड बॉर्डर प्रोटेक्शन यांनी प्रसिद्ध केली होती. या प्रस्तावावर अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी होणार आहे.

या घडामोडींमुळे अमेरिकेत करिअरचे स्वप्न पाहणारे भारतीय विद्यार्थी, आयटी व्यावसायिक आणि तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये चिंता वाढली असून, ट्रम्प प्रशासनाच्या स्थलांतर धोरणाचा आणखी एक कठोर टप्पा सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नीट पेपरफुटी प्रकरणाला नवे वळण! तीन आरोपींची ‘सत्यपरीक्षण’ आणि ‘मेंदू नकाशांकन’ चाचणीची मागणी; केंद्रीय अन्वेषण विभागाला न्यायालयाची नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात मंगळवारी महत्त्वाची न्यायालयीन घडामोड घडली. दिल्लीतील विशेष जलदगती न्यायालयाने या प्रकरणातील तीन आरोपींनी स्वेच्छेने सत्यपरीक्षण (पॉलीग्राफ) आणि मेंदू विद्युत सक्रियता नोंद (बीईएपी) अर्थात मेंदू नकाशांकन चाचणी करण्याची मागणी केल्यानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाकडून उत्तर मागवले आहे. या अर्जाची कायदेशीर ग्राह्यता आणि पुढील कार्यवाहीबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

मंगललाल बिवाल, दिनेश बिवाल आणि विकास बिवाल यांनी न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात आपण कोणत्याही दबावाखाली नसून पूर्णपणे स्वेच्छेने या चाचण्या देण्यास तयार असल्याचे नमूद केले आहे. या चाचण्यांमुळे आपली प्रामाणिक भूमिका स्पष्ट होईल आणि केंद्रीय अन्वेषण विभागाला निष्पक्ष, पारदर्शक व सखोल तपास करण्यास मदत मिळेल, असा दावा आरोपींनी केला आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणामुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य आणि परीक्षा व्यवस्थेची विश्वासार्हता प्रश्नचिन्हाखाली आली होती. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अन्वेषण विभागाकडून व्यापक तपास सुरू असून अनेक आरोपींना अटक करण्यात आली आहे. आता आरोपींनीच स्वेच्छेने सत्यपरीक्षण आणि मेंदू नकाशांकन चाचणीची मागणी केल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

मात्र, अशा वैज्ञानिक चाचण्यांचे निष्कर्ष न्यायालयात अंतिम पुरावा मानले जात नाहीत. तपासाला दिशा मिळण्यासाठी किंवा उपलब्ध पुराव्यांची पडताळणी करण्यासाठी त्यांचा उपयोग होऊ शकतो. त्यामुळे केंद्रीय अन्वेषण विभागाची भूमिका ऐकल्यानंतरच न्यायालय या मागणीवर अंतिम निर्णय देणार आहे. देशातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या शैक्षणिक घोटाळ्यांपैकी एका प्रकरणातील या घडामोडीकडे विद्यार्थी, पालक आणि संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

## रिझर्व्ह बँकेच्या निर्णयापूर्वी शेअर बाजारात घसरण; गुंतवणूकदारांची सावध भूमिका,

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर । वृत्तसंस्था**

मुंबई : रिझर्व्ह बँकेच्या आज होणाऱ्या पतधोरण समितीच्या निर्णयापूर्वी मंगळवारी भारतीय शेअर बाजारात सावध व्यवहार आणि नफावसुलीचे चित्र पाहायला मिळाले. प्रमुख निर्देशांक निफ्टी-५० आणि इतर आघाडीचे समभाग दबावाखाली राहिल्याने बाजारात घसरण नोंदवली गेली. सोमवारी झालेल्या जोरदार तेजीचा काहीसा परिणाम मंगळवारी कमी झाल्याचे दिसून आले.

बाजारातील घसरणीमागे फ्युचर्स आणि ऑप्शन्सशी संबंधित समभागांसाठी लागू करण्यात आलेल्या नव्या समारोप लिलाव प्रणालीचाही परिणाम असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या नव्या व्यवस्थेनंतर गुंतवणूकदारांनी आपल्या व्यवहारांमध्ये बदल केल्याने बाजारात चढ-उतार वाढले. दरम्यान, बाजारातील भीती आणि अनिश्चिततेचे प्रमुख मोजमाप मानला जाणारा अस्थिरता निर्देशांक (व्होलॅटिलिटी इंडेक्स) आठवड्यातील सर्वोच्च पातळीवर पोहोचला. यावरून गुंतवणूकदारांनी रिझर्व्ह बँकेच्या निर्णयापूर्वी जोखीम कमी करण्यावर भर दिल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय, साप्ताहिक निफ्टी डेरिव्हेटिव्ह करारांच्या मुदतपूर्तीपूर्वीही मोठ्या प्रमाणावर पोझिशन्समध्ये बदल करण्यात आल्याने बाजारावर दबाव वाढला. आज रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीकडे संपूर्ण वित्तीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

व्याजदर, महागाई, आर्थिक वाढ आणि तरलतेबाबतचे संकेत बाजाराच्या पुढील दिशेसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. त्यामुळे गुंतवणूकदार आणि उद्योग क्षेत्राने सावध भूमिका घेतली असून, निर्णयानंतर शेअर बाजारात मोठी हालचाल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


# ‘तरुण वकील व्यवसाय सोडून जाऊ नयेत!’ मुंबई उच्च न्यायालयाची राज्य सरकार आणि बार कौन्सिलला फटकार; आर्थिक मदतीबाबत सविस्तर भूमिका मागवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

वकिली व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात आर्थिक अडचणींमुळे अनेक तरुण वकील व्यवसाय सोडण्याच्या उंबरठ्यावर असल्याची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. तरुण वकिलांना आर्थिक आधार देण्यासाठी आतापर्यंत कोणती पावले उचलली आहेत किंवा भविष्यात कोणत्या योजना राबविणार आहेत, याबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट शब्दांत निरीक्षण नोंदवले की, तरुण वकील आर्थिक अडचणींमुळे व्यवसायातून बाहेर पडू नयेत. न्यायदान व्यवस्थेचा कणा मजबूत ठेवायचा असेल, तर नव्याने व्यवसायात येणाऱ्या वकिलांना आवश्यक आर्थिक पाठबळ मिळणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.



ही याचिका तरुण वकिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाशी संबंधित असून, वकिलीच्या पहिल्या काही वर्षांत नियमित उत्पन्न नसल्यामुळे अनेकांना गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो, असा मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला आहे. अनुभवी वकिलांकडे प्रशिक्षण घेत असताना अत्यल्प मानधन किंवा अनेकदा कोणतेही मानधन मिळत नसल्याने अनेक गुणवंत तरुण हा व्यवसाय अर्धवट सोडतात, असेही याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

याच पार्श्वभूमीवर न्यायालयाने महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिल आणि राज्य सरकारला ठोस धोरण तयार करण्याची गरज अधोरेखित केली आहे. आर्थिक सहाय्य, मानधन योजना किंवा अन्य कल्याणकारी उपाययोजनांबाबत नेमकी भूमिका स्पष्ट करण्यास सांगण्यात आले असून, त्यासाठी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, तरुण वकिलांना आर्थिक संरक्षण देण्याचा मुद्दा गेल्या काही वर्षांपासून चर्चेत आहे. यापूर्वीही कनिष्ठ वकिलांसाठी कायमस्वरूपी मानधन योजना लागू करण्याची मागणी न्यायालयात करण्यात आली होती. तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियानेही कनिष्ठ वकिलांसाठी किमान मानधनाबाबत शिफारसी केल्या आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे राज्यातील हजारो नवोदित वकिलांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. राज्य सरकार आणि बार कौन्सिल न्यायालयासमोर कोणती ठोस योजना मांडतात, यावर आता कायदा व्यवसायात प्रवेश करणाऱ्या नव्या पिढीचे भवितव्य आणि आर्थिक सुरक्षिततेचे चित्र मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.